महाराष्ट्र शासन
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६/४५९/४२१
ई-मेल–desk18@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक: १८/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२४/२९३ दिनांक: १६/०७/२०२४

**उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन २०२४-२५ करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्याबाबतची जाहिरात.**

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील ज्या गुणवंत विद्यार्थ्यांनी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी व पीएचडी अभ्यासक्रमासाठी, THE (Times Higher Education) / किंवा QS (Quacquarelli Symonds) World Ranking २०० च्या आंत असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतला असेल, अशा विद्यार्थ्यांकरीता **"गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन २०२४-२५ करिता** योजना राबविण्यांत येत आहे.

या शिष्यवृत्ती योजने अंतर्गत एकूण ४० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत पात्र उमेदवारांकडून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी Online पध्दतीने अर्ज मागविण्यांत येत आहेत.

खालीलप्रमाणे शाखा / अभ्यासक्रम निहाय जागा उपलब्ध असतील: -

| अ.क्र. | शाखा / अभ्यासक्रम | पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका | डॉक्टरेट | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | कला | ०३ | ०१ | ०४ |
| २. | वाणिज्य | ०३ | ०१ | ०४ |
| ३. | विज्ञान | ०३ | ०१ | ०४ |
| ४. | व्यवस्थापन | ०३ | ०१ | ०४ |
| ५. | विधी अभ्यासक्रम | ०३ | ०१ | ०४ |
| ६. | अभियांत्रिकी/वास्तुकला शास्त्र | १२ | ०४ | १६ |
| ७. | औषधनिर्माणशास्त्र | ०३ | ०१ | ०४ |
| | **एकूण** | **३०** | **१०** | **४०** |

**सदर शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत:**

- उमेदवार व उमेदवाराचे आई / वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावेत.
- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रवेश घेतलेल्या व प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे अद्ययावत (सन २०२४ मधील) THE (Times Higher Education) / किंवा QS (Quacquarelli Symonds) World Ranking २०० च्या आंत असणे बंधनकारक आहे.
- उमेदवाराच्या पालकांचे/कुटुबांचे व उमेदवार नोकरी करीत असल्यास त्याचे स्वत: चे उत्पन्न धरुन सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील **(२०२३-२४ मधील) एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखापेक्षा जास्त नसावे.**
- या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, मिळणारे लाभ, निवड कार्यपद्धती, सुधारित वेळापत्रक इत्यादी माहिती करिता तंत्र शिक्षण संचालनालयाच्या **https://fs.maharashtra.gov.in** या संकेतस्थळास भेट द्यावी.

इच्छुक उमेदवारांनी **https://fs.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज भरावा व online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी संबंधित विभागीय कार्यालयात खालील वेळापत्रकानुसार सादर करावीत.

| क्र. | कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | **संकेतस्थळावर** online पद्धतीने अर्ज भरणे व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रे अर्जासोबत अपलोड करणे | १८ जुलै, २०२४ ते ०९ ऑगस्ट, २०२४ |
| २ | उमेदवारांनी खालील प्रमाणे शाखा /अभ्यासक्रम निहाय online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह विभागीय कार्यालयात पडताळणीसाठी अर्ज सादर करण्याची मुदत.<br>• (अ) कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी ज्या उमेदवारांनी अर्ज केला आहे व उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्यातील संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, उच्च शिक्षण या ठिकाणी.<br>• (ब) व्यवस्थापन, अभियांत्रिकी / वास्तुकलाशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी ज्या उमेदवारांनी अर्ज केला आहे त्यांनी उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्यातील संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, तंत्र शिक्षण या ठिकाणी. | १९ जुलै, २०२४ ते १२ ऑगस्ट, २०२४ (सायंकाळी ५.०० वा. पर्यंत) |

विभागीय कार्यालये, उच्च शिक्षण आणि विभागीय कार्यालये, तंत्र शिक्षण यांची यादी वरील संकेतस्थळावरील माहिती पुस्तिकेमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

**Online अर्जाशिवाय इतर कोणत्याही पध्दतीने केलेला अर्ज विचारात घेण्यांत येणार नाही.** इच्छुक उमेदवारांनी निर्धारित कालावधीत वरील प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

स्वा /-

**(डॉ. विनोद मोहितकर)**

संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य, मुंबई